महाराष्ट्र शासन
स्वातंत्र्यसेनानी पद्मभूषण बाळासाहेब भारदे
# शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शेवगाव.
पाथर्डी रोड,शेवगाव जि. अहिल्यानगर -४१४५०२
E-mail ID : iti.shevgaon@dvet.gov.in Office☎ (02429) 221261

जा.क्र./औप्रसंशे/भांडार/२०२५-२६/ ३९८ दि. ०८/०४/२०२५

## स्क्रॅप विक्री जाहीर सुचना

तमाम नागरीकांना या सुचनेव्दारे कळविण्यात येते की स्वातंत्र्यसेनानी पद्मभूषण बाळासाहेब भारदे शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था, शेवगाव, जि. अहिल्यानगर -४१४५०२ या संस्थेतील परिशीष्ठ क्र १ मधे नमुद केलेल्या वर्णनाचा निरुपयोगी निर्लेखित/स्क्रॅप पुस्तके आहे त्या स्थितीत जेथे आहे तेथे व जसे आहे तसे या तत्वावर जास्तित जास्त किंमतीस विक्री करावयाचे आहे. सदर विक्री ही खालील अटी व शर्तीवर करण्यात येणार आहे. सदर अटी व शर्ती मान्य असणा-या पात्र खरेदीदाराकडुन दोन लिफाफा पध्दतीने मोहोरबंद निवीदा मागविण्यात येत आहेत. तरी जास्तित जास्त इच्छुक खरेदीदारांना भाग घेण्याकरीता आमंत्रित करण्यात येत आहे.

### परिशीष्ट क्र १

| अ.क्र. | स्क्रॅप विक्री साहीत्याचा तपशील | स्क्रॅप साहीत्याची अंदाजीत संख्यां |
|---|---|---|
| १ | निर्लेखित/स्क्रॅप ग्रंथालयीन पुस्तके | ७०० किलो |
| २ | निर्लेखित माहिती पुस्तिका, उत्तरपत्रिका,प्रवेश अर्ज व इतर कागदपत्र | ५०० किलो |
| ३ | पुठठा स्क्रॅप | ५० किलो |

### निविदा अटी व शर्ती

१) सदर स्क्रॅप साहीत्य खरेदी करणा-या इच्छुक निविदाधारकांनी संस्थेत शासकीय सुटीचे दिवस वगळुन दिनांक १५/०४/२०२५ दुपारी २:०० वाजेपर्यंत सोबत जोडलेल्या निवीदा फॉर्म मधे सादर कराव्या. सदर स्क्रॅप साहीत्य निवीदा भरण्यापुर्वी प्रत्यक्ष पाहुन घ्यावे.

२) निविदे सोबत अनामत रक्कम रु १०००/- रोखीने अथवा डी.डी. स्वरूपात संस्थेतील रोखा विभागात जमा करावी.

३) सदर बाबतची मोहरबंद निविदा ही दि १५/०४/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत स्वातंत्र्यसेनानी पद्मभूषण बाळासाहेब भारदे शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था, शेवगाव, जि. अहिल्यानगर -४१४५०२ यांचे भांडार विभागाकडे दोन लिफाफा पध्दतीने जमा करावी.

४) लिफाफा क्र. १ (तांत्रिक लिफाफा)- अ) पॅन कार्डची छायांकीत प्रत ब) जी.एस. टी. प्रमाणपत्राची छायांकीत प्रत क) अनामत रक्कम भरल्याची पावती.

५) लिफाफा क्र. २ - आर्थिक बोली लिफाफा. यामधे यामधे वरील तक्त्यात नमुद अ.क्र. ०१ प्रमाणे स्क्रॅप साहित्याचा दर प्रती किलो प्रमाणे निवीदेमधे भरण्यात यावा. किलोप्रमाणे दर न भरल्यास निवीदा बाद करण्यात येईल.

६) निवीदाधारकांचे जीएस.टी. नोंदणी क्रमांक असणे आवश्यक आहे. जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र असल्या शिवाय निवीदा स्विकारली जाणार नाही.

७) वरील नमुद वेळेनंतर आलेल्या निविदेचा विचार करण्यात येणार नाही. सदर निविदा ही दि. १६/०४/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित निवीदाधारकां समक्ष मा. प्राचार्य कक्षात उघडण्यात येईल.

८) जे निवीदाधारक तांत्रिक लिफाफयामधील कागदपत्रांची पुर्तता करतील तेच आर्थिक बोली लिफाफा उघडण्यासाठी पात्र ठरतील. निवीदाधारक तांत्रिक लिफाफयामधील कागदपत्रांची पुर्तता करणार नाहीत त्यांचे आर्थिक बोली लिफाफा क्र. २ उघडण्यात येणार नाही याची सर्व निवीदाधारकांनी नोंद घ्यावी.

९) स्क्रॅप साहीत्याची योग्य ती कींमत निविदाधारकांकडुन न आल्यास निविदा नामंजुर करणे ,स्थगिती देणे अथवा रदद करणे बाबतचे सर्व अधिकार मा. प्राचार्य स्वातंत्र्यसेनानी पद्मभूषण बाळासाहेब भारदे शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था, शेवगाव, अहिल्यानगर यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१०) विक्रीचे आदेश प्राप्त झाल्यानंतर सात दिवसांचे आत सर्व रक्कम भरणे बंधनकारक आहे. रक्कम भरल्यानंतर तात्काळ सदर स्क्रॅप साहीत्य आहे त्या स्थीतीत स्वखर्चाने घेउन जावे लागेल .

११) उत्तरपत्रिका बाबत लगदा करण्याचे हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१२) स्क्रॅप साहीत्य घेउन जाण्यापूर्वी **यशस्वी निवीदाधारकांना विक्रीच्या किंमतीवरील GST व इतर आवश्यक त्या करांचा नियमानुसार स्वतंत्रपणे भरणा करणे बंधनकारक राहील. तसेच आयकर कायद्यामधील तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.**

१३) निवीदा पाकीटावर खरेदीदाराने आपल्या फर्मचे नाव पत्ता व मोबाईल नं.नमुद करावा

१४) निवीदा उघडतेवेळी आपला प्रतिनिधी उपस्थीत रहाणे आवश्यक आहे.

१५) निवीदाधारकाने लॉट नेण्यास नकार दिल्यास अथवा विलंब केल्यास अनामत रक्कम जप्त केल्या जाईल याची सर्व निवीदाधारकांनी नोंद घ्यावी.

१६) सदर स्क्रॅप विक्रीबाबत काही अडचण असल्यास पुढील क्रमांकावर संपर्क साधावा- श्री जी.एन. स्वामी (भांडारपाल) मो. नं. ९९२३८१४७३३.

(श्री यु.डी.पालवे)
प्राचार्य
स्वातंत्र्यसेनानी पद्मभूषण बाळासाहेब भारदे,
शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,
शेवगाव, जि. अहिल्यानगर.

प्रति.

१) सुचना फलक औदयोगिक प्रशिक्षण संस्था, शेवगाव, जि. अहमदनगर.
२) मा. .जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी अहमदनगर .
३) मा. तहसिलदार ,शेवगाव, जि. अहमदनगर.
४) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, नगर परिषद शेवगाव जि. अहमदनगर .
५) मा. पोस्ट मास्तर ,पोस्टऑफीस, शेवगाव,जि. अहमदनगर .
६) मा. अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, शेवगाव,जि. अहमदनगर .
७) मा. गटविकास अधिकारी. पंचायत समिती, शेवगाव, जि. अहमदनगर.

महोदय, आपणास विनंती करण्यात येते की सदर **स्क्रॅप निविदा सुचना** आपले नोटीस बोर्डावरती प्रसिध्द करण्यात यावी .